ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# आत्मनिष्ठेच्या बळावर उभे राहिलेले आत्मचरित्र : लांबा उगवे आगरी

**प्रा. डॉ. भाऊसाहेब वि. गमे**
**मराठी विभाग प्रमुख**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला जि.नाशिक**
**E-mail : bvgame@rediffmail.com**

मराठी साहित्यात आत्मचरित्रपर लेखन आत्मवृत्त, आत्मचरित्र, आत्मकथा, आत्मकथन, आत्मवृत्तांत, आत्मनिवेदन, माझा जीवन प्रवास, माझी जीवन कहाणी या नावाने पुढे आलेले आहे. म्हणजेच आत्मचरित्रामध्ये मी व माझे जीवन केंद्रस्थानी असते. आत्मचरित्र ही संकल्पना मराठीमध्ये १९ व्या शतकात उदयाला आली. या कालखंडात विविध क्षेत्रातील आत्मचरित्रे व तशा स्वरूपाचे लेखन केलेले आहे. इंग्रजीमध्ये ऑटोबायोग्राफी या शब्दासाठी मराठीत आत्मचरित्र ही संकल्पना वापरली जाते. याचा अर्थ स्वतःच्या जीवनाचा काढलेला आलेख असा आहे. आत्मचरित्र म्हणजे विशिष्ट व्यक्तीने जीवन प्रवासात चाललेले अंतर स्वतःच्या भाषेत मांडणे होय. भारतीय संस्कृतीत आत्म या नामाचा संबंध आत्म्याशी जोडलेला आहे. त्यामुळे स्वतःच्या आत्म्याशी प्रामाणिक राहून जीवनातील कटू-गोड अनुभूतींचे आत्मचरित्रात सादरीकरण केले जाते. त्यामुळे आत्मचरित्र म्हणजेच आत्माविष्कार असेही म्हटले जाते. भारतीय आत्मचरित्रामध्ये विशिष्ट व्यक्तींच्या गुणदोषांपेक्षा कार्यावर प्रकाश टाकलेला आढळतो. पाश्चिमात्य आत्मचरित्रांमध्ये मात्र व्यक्तीनिष्ठ गुणदोषांची चर्चा केलेली असते.

प्रत्येक आत्मचरित्र लेखनामागे लेखकाच्या काही प्रेरणांही असतात. अंतःकरण हलके करणे, आपले कार्य कर्तृत्व समाजासमोर मांडणे, कार्य प्रचार व आत्मसमर्थन करणे, आत्मशोध व आत्मपरीक्षण करणे, गतस्मृतींना उजाळा देणे म्हणजेच स्वतःला व्यक्त करणे हा आत्मचरित्राचा मुख्य भाग आहे. आत्मचरित्रांचे प्रामुख्यांने सामाजिक, व्यक्तींचे आत्मचरित्र व खाजगी व्यक्तींचे आत्मचरित्र असे दोन प्रकार पडतात. दोघेही प्रकार नायक प्रधानच आहेत.

खाजगी आत्मचरित्रामध्ये विशिष्ट व्यक्तीची वैयक्तिक सुख-दुःखे, आशा-आकांक्षा, भाव - भावना, यश-अपयश, राग, लोभ, मत्सर यांना प्राधान्य दिलेले असते. अशी आत्मचरित्रे अंतर्मुख स्वरूपाची असतात. स्वजीवनालाच यामध्ये महत्त्व असते. स्वतःच्या दृष्टीकोनातून या आत्मचरित्रांमधील 'मी' संपूर्ण समाज, जग यांचे मूल्यमापन करीत असतो.

प्राचार्य म.सु.पाटील हे मराठीतील प्रसिध्द साहित्यिक समीक्षक आहेत. संपूर्ण आयुष्यच साहित्याला वाहिलेले हे व्यक्तीमत्त्व सगळ्या महाराष्ट्राला माहित आहे. दलित कविता (१९८१), अक्षरवाटा - १९८२, बालकवींचे काव्यविश्व - १९८९, सदानंद रेगे यांचे काव्यविश्व - १९८९, आदिबंधात्मक समीक्षा - १९८९, भारतीयांचा साहित्य विचार १९९०, कवितेचा रूपशोध - १९९९, साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध - २००१, इंदिरा यांचे काव्यविश्व - २००१, ज्ञानेश्वरीचा तृष्णाबंध - २००४, तुकाराम-अंतरबाह्य संघर्षाची अनुभव रूपे - २००४, ज्ञानेश्वरीचा काव्यबंध - २००६, दलित कविता आणि दलित साहित्याचे सौंदर्य शास्त्रा - २०१०, स्मृतीभ्रंशानंतर - २००८, तसेच वेगवेगळ्या समीक्षा ग्रंथांमध्ये २५ लेख प्रसिध्द आहेत. अशा प्रतिभावंत समीक्षकांचे 'लांबा उगवे आगरी' हे आत्मचरित्र २५ डिसेंबर २०१४ रोजी प्रसिध्द झाले. डॉ. म.सु. पाटील यांचे बालपण ते आज पर्यंतची जीवन कहाणी समाजाला उपलब्ध झाली. आज वयाच्या ८५ व्या वर्षीही त्यांच्यातील समीक्षक, विचारवंत, मोठ्या ताकदीने लेखन करीत आहे.

मुंबईच्या ग्रंथाली प्रकाशनाने डॉ. म.सु.पाटलांची जीवन कहाणी प्रकाशीत केलेली असून ३८९ पृष्ठांमधून डॉ. म.सु.पाटील व्यक्त होतात. हे व्यक्त होत असताना समकालीन सामाजिक परिस्थिती, जगणं, साहित्यिक, वातावरण,

लेखन, कौटुंबिक जबाबदाऱ्या या सर्वांचे वर्णन ते अतिशय बारकाव्याने करतात. त्यामुळे आत्मचरित्र वाचतांना एखाद्या चलचित्रपटाप्रमाणे वाचकांच्या पुढे उभे राहते. समाजापुढे उभी राहते ती त्यांची समीक्षक म्हणून प्रतिमा. त्यांच्या लेखनातून त्यांचे व्यक्तीमत्त्वही उभे राहते. डॉ. म.सु.पाटील यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारापासून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील जीवन गौरव पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. २००७ साली उल्हासनगर येथे झालेल्या १० व्या कोकण साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. साहित्यापासून नवे विचार मांडण्याची त्यांची स्वतःची पध्दती आहे. आत्मचरित्र वाचतांना त्यांचे साहित्य विचार वेळोवेळी जाणवतात. आदिबंधात्मक समीक्षा, तृष्णेचा विचार, तृष्णेची स्त्री केंद्रीयता, अस्तित्त्वप्रत्यय हे त्यांचे स्वविचार मराठी समीक्षेमध्ये मोलाची भर घालतात. १९४६ ते १९६९ या कालखंडात कामगार, कारकून, शिक्षक, प्राध्यापक म्हणून त्यांनी सेवा केली. परंतु १९६९ ते १९८९ असा प्रदीर्घ कालखंड त्यांनी प्राचार्य पदावर काम करून प्रशासक व साहित्यनिर्माता, समीक्षक या दोन व्यक्तीमत्त्वांमधील सर्जनशीलतेचा आणि सृजनशीलतेचा अनोखा मेळ घातला. म. गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प संचालित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मनमाड येथे जवळ जवळ २० वर्षे ते प्राचार्य होते. त्यांची साहित्यिक उर्मी व लेखन प्रेरणा अनेक साहित्यिकांच्या वर्तृळात तयार झाली. त्यामुळे या काळात मनमाड हे साहित्याचे केंद्रबिंदू बनले होते.

डॉ. म.सु.पाटील हे मूळचे कोकणातील त्यामुळे तेथील शेती, रीतीरिवाज, माणसांच्या जगण्यातल्या तऱ्हा, वेगळेपण हे सर्वच त्यांच्या आत्मचरित्रातून येते. 'लांबा उगवे आगरी' हे आत्मचरित्राचे नाव मोठे समर्पक आहे. त्याबाबत म.सु.पाटील लिहितात - आगरात उगवणारा लांबा धान्यधुन्य सरण्याच्या दिवसात पोटापाण्याचे आधार होणारं, भातामधलं हे भात जरा लवकर पिकवणारं, तसा या आत्मचरित्रातील मी भाषांतर्गत भाषेवर वाढलेला बालपण सरण्याअगोदर वयसेचिया गावा आलेला आणि आईबाबांचा आधार झालेला.

संपूर्ण आत्मचरित्रात म.सु.पाटील अतिशय प्रांजळपणे आपली कहाणी सांगतात. कौटुंबिक जीवन मांडत असतांनाही ते कधी समाजभाष्य करतात हे वाचकांनादेखील कळत नाही. इतके नेमकेपणाने ते टिपतात. मुळातच समीक्षकांचा पिंड असल्यामुळे प्रत्येक छोट्या मोठ्या घटनेकडे पाहण्याची त्यांची दृष्टीच वेगळी आहे. आपल्या जीवनाच्या यशस्वीतेचे श्रेय ते कधीही स्वतःकडे घेत नाही. मी केवळ एक निमित्तमात्र आहे. अशीच त्यांची भूमिका आहे. गावच्या मातीला व माणसांना विसरू नये हे त्यांचे बालपणाचे संस्कार आत्मचरित्रातून व्यक्त होतात. निळू शेठ, मारूती शेठ, शिवाजी दादा यांसारख्या गावकऱ्यांना ते विसरत नाही. अनेक साहित्यिक मित्रांनी त्यांना उर्जा दिली. एम.के.पाटील, कवी पुरुषोत्तम पाटील, प्राचार्य प्र.वि.खंडारे, प्राचार्य प्रभाकर बागले यांच्या संगतीत साहित्य चर्चा, चर्चासत्रे आयोजित करता आली. डॉ. म.सु.पाटील स्वतःच व्यासंगी व हाडाचे शिक्षक. त्यामुळे त्यांच्यातील माणूस व शिक्षकांचे प्रतिबिंब पानोपानी दिसते. त्यांना लाभलेले विद्यार्थीही मोठे प्रतिभावंत आहेत. त्यात डॉ. रमेश वरखेडे, प्रा.गो.तु.पाटील, प्रतिभा कनेकर यांचा उल्लेख पुन्हा पुन्हा येतो. प्राचार्य रा.वे.खैरनार, रामजी बेकर, ओगले मास्तर, जे.के.पाटील, राव सर या शिक्षकांबाबतचे ऋणही ते व्यक्त होते.

डॉ. म.सु. पाटलांना तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे हस्ते पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. रावसाहेब कसबे, कथाकार भारत सासणे, बाळासाहेब विखे पाटील असे मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी ते प्रवरानगरला गेले आणि गेले तीस वर्ष या परिसरात राहिल्यामुळे सारी माणसे, परिसर डोळ्यापुढे उभा राहिला. इथून आत्मचरित्राची प्रेरणा मिळते व आत्मचरित्राच्या शेवटी ते लिहितात - "*म्हणूनच आज खेळात रमलेल्या, स्वतःशीच बोलणाऱ्या लहान मुलासारखा मी माझ्याशीच बोलतो आहे, भूताला वर्तमानात आणून न्याहाळतोय. त्याचा नितळपणा मला जाणवतो आहे आणि गाळ खाली बसला आहे. शरदातल्या नदी प्रवाहातला पारदर्शीपणा जाणवतो आहे. सगळे संबंध आता स्वच्छ झाले आहेत.*

*प्रत्येकाची एक बाजू असते. एवढे कळण्याइतकं तरी मन निर्मळ झाले आहे म्हणून दुसऱ्याच्या जागी मी असतो तर असा विचार आज मी करू शकतो. आज जीवन गौरव घेतांना माझ्या मनात या साऱ्या नात्यांची, संबंधांची, प्रसंगांची उब आहे. ती घेवून पुढे हा जो काही प्रवास उरला आहे तो करणार आहे."*

या संपूर्ण आत्मचरित्रात १९८६ पासून ते २०१४ पर्यंतची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक स्थिती अधोरेखित झाले आहे. कोकणापासूनचा तर मनमाडपर्यंतचा व मनमाड पासून पुन्हा मुंबई पर्यंतचा प्रवास जसा खाचा खळग्यांचा तसाच आनंददायी आहे. पत्नी विभावरी, त्यांची नोकरी व प्रवास, त्यातील ताणतणाव, यांचे चित्रणही ते पारदर्शीपणे करतात. मुलगी कवयत्री नीरजा, अनुराधा, तृप्ती, अस्मिता यांचे संगोपन, संस्कार, त्यांची लग्ने, बाळतपणे व इतर छोट्यामोठ्या गोष्टीतून एक पिता म्हणून म.सु.पाटील उभे राहतात. जावयांना मुलगा मानणारे म.सु.पाटील हे खरे ह्रदयस्पर्शीच वाटतात. प्रा. जयप्रकाश लब्दे, श्री.राजन, श्री.गजन, श्री.शंकर या जावायांच्या बाबत लिहितांनाही त्यांची लेखणी गतीमान बनते. तात्यासाहेब शिरवाडकरांपासून ते भालचंद्र नेमाडे यांचे पर्यंत अनेक साहित्यिकांच्या सहवासाचा आनंद त्यांनी घेतला. १९७७ ला विद्यार्थी डॉ. रमेश वरखेडे यांनी सुरु केलेल्या अनुष्टुभ नियतकालीकाची जोपासना त्यांनी आत्मियतेने केली. किंबहुना अपत्याप्रमाणे संगोपन केले. नोकरीमध्ये आलेज्या अडचणी, अनुभव त्यांनी मोकळेपणाने मांडले. प्राचार्य असतांनाही व्यवस्थापनाशी झालेले मतभेदही व्यक्त केलेत. परंतु स्वतःमधील माणसाला त्यांनी कधीही संपू दिले नाही. त्यामुळे जेवढी ही कहाणी लालित्यपूर्ण आहे तेवढीच ती विचारप्रवणही आहे. नवीन पीढीने वाचून नक्कीच आदर्श घ्यावा अशी ही जीवन कहाणी आहे.

**संदर्भ :**

१. पाटील (डॉ.) म. सु. - 'लांबा उगवे आगरी' , ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २५ डिसेंबर २०१४